**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट दिनांक - ०४/०२/२०२३

**दि.०३/०२/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण १९२/२०२३ भादवि कलम ३०७,३२४, ५०४,५०६, १४३,१४७, १४८,१४९ , प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०२/०२/२०२३ रोजी १८/०० वा चे सुमारास मौजे भोसे गावचे हदिदत शेती जमीन गट नंबर ८४२ ता खेड जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | ०३/०२/२०२३ रोजी ०२.४३ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १) नंदु सखाराम लोणारी, २)सखाराम विठ्ठल लोनारी ,३) बबलु उर्फ चंद्रशेखर सखाराम लोणारी ४) कृष्णा खंडु अरगडे, ५) संतोष महादु गांडेकर व इतर आनोळखी लोंक,**आरोपी क्रं १ ,२ व ५ अटक आहेत** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर यांनी आमचे कडुन बांधकामाचे साहित्य का घेतले नाही याचा राग मनात धरून शेतातुन उस वाहतुक करायची नाही असे म्हणुन आरोपी क्र २ याने हातातील दगडाने फिर्यादी यांचा दिर नामे नवनाथ किसन गांडेकर यांचे डोक्यात मारून आरोपी क्र ३ व ४ यांनी काठीने व लोखंडी रॉडने डोक्यात व पाठीवर मारून आरोपी क्र ५ याने काठीने मारहान करून सोबत असलेल्या अनोळखी लोकांनी लाथा बुक्यांनी व हाताने मारहान करून शिवीगाळ दमदाटी करून आरोपी क्र १ याने हातातील कोयत्या सारख्या धारधार हत्याराने फिर्यादी यांचे चुलत सासरे तुळशीराम यांचे डोक्यात जिवे ठार मारण्याचे उददेशाने वार करून त्यांना जखमी केले व धरा या सगळयांना आज कोणालाही जिवंत सोडायचे नाही असे म्हणुन जखमी केले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोसई शेंडकर ८३०८८२५१०६ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी १०९/२०२३ भादवि कलम ३७६, लैगिंक अपराधांपासुन बालकांचे संरक्षण अधि २०१२ चे कलम ४,८ प्रमाणे प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | नोव्हेंबर २०२२ मध्ये (नक्की तारीख वेळ आठवत नाही) भोसरी गावठाण, आरोपी राहत असलेल्या एका बिल्डींग मध्ये भोसरी |
| गुन्हा दाखल | :- | ०३/०२/२०२३ रोजी ०१.४७ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी , वय १६ वर्षे ९ महिने |
| आरोपी | :- | छोटु वय २२ वर्ष, मुळ रा. बिहार (पुर्ण नाव पत्ता महित नाही) **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी व फिर्यादी यांची नोव्हेंबर २०२२ मध्ये ओळख होवुन त्या ओळखीचा फायदा घेवुन फिर्यादीस त्याचे रहाते खोलीत बोलवुन माझे तुझ्यावर प्रेम आहे असे सांगुन फिर्यादी सोबत शारिरीक संबंध करुन तिस गर्भवती केले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि खाडे ८२७५४५६७५५ |

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | रावेत ८४/२०२३ भा.दं.वि कलम ३७६,३५४(अ)(१)(२),४२०,४०६,५०६,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ऑक्टोंबर २०२० ते आजपावेतो फसवणुक तसेच दिनांक. १९/०५/२०२२ रोजी फिर्यादी यांचे राहते घरी,रावेत पुणे आणि दिनांक २४/११/२०२२ मध्ये सध्यांकाळी ०८.०० वा.चे सुमारास,चिंचवड येथील मेडीकल शॉप येथे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०२/२०२३ रोजी २१:५८ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी , वय ३४ वर्षे |
| आरोपी | :- | १) अभिजित अरुण ताजणे वय ३८ वर्षे,<br>२) महिला आरोपी वय ३७ वर्षे (दोघे रा.ठाणे, पुर्ण पत्ता माहित नाही.) **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळेस व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ व त्याची पत्नी आरोपी क्रं २ यांनी फिर्यादीचा त्यांचेशी असलेल्या ओळखीचा फायदा घेवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन ऑक्टोंबर २०२० मध्ये रावेत हददीत मंगलमुर्ती मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल नावाने सुरु केलेल्या हॉस्पीटल मध्ये मेडीकल टाकण्यासाठी डिपॉझीट म्हणुन २०,००,०००/- रुपये तसेच हॉस्पीटलसाठी हातउसने म्हणुन २८,४०,६५९/- रुपये असे एकुण ४८,४०,६५९/- रुपये फिर्यादीकडुन घेतले होते.सदर पैशांतुन डिपॉझिटची रक्कम ते फिर्यादीला हॉस्पीटल सोडतेवेळी व हातउसने घेतलेले पैसे १ वर्षोत फिर्यादीला परत करणार होते. फिर्यादी यांनी मेडीकल सोडल्यानंतर त्यांचे पैशांबाबत आरोपी मजकुर यांना विचारणा केली असता ते फिर्यादीला देवु देवु असे म्हणुन टाळाटाळ करीत होते. तरी सुध्दा ते पैसे देत नसल्याने फिर्यादी यांची खात्री झाली आहे की आरोपी मजकुर यांनी फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. मे २०२२ मध्ये आरोपी क्रं १ हे फिर्यादीस 'तु मला आवडतेस, तु माझ्या सोबत फिजिकल रिलेशन ठेव' असे म्हणुन फिर्यादी यांची लैंगिक सतावणुक केली. तसेच दिनांक १९/०५/२०२२ रोजी व दिनांक २४/११/२०२२ रोजी फिर्यादीस तु माझ्यासोबत शरीरसंबध ठेव नाहीतर मी तुझे अश्लिल फोटो तुझ्या सर्व नातेवाईकांना पाठवुन तुझी बदनामी करेन अशी धमकी फिर्यादीचे इच्छेविरुध्द शरीरसंबंध ठेवले ज्या-ज्या वेळी फिर्यादी यांनी त्यांच्या पैशांची मागणी केली तेव्हा आरोपी मजकुर यांनी फिर्यादी यांना धमकी देत की ''तुझे अश्लील फोटो आमचेकडे आहेत आम्ही ते तुझ्या नातेवाईकामंध्ये व मित्रांना सोशल मिडीयाच्या माध्यमांतुन प्रसारीत करुन तुझी बदनामी करु'' वगैरे तक्रारीवरुन गुन्हा दाखल. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | म.पो.उपनिरीक्षक प्राचि तोडकर ८४२४०२७५०६ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी १०८/२०२३ भादवि कलम ३५४(अ) ५०४, ५०६,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ऑगस्ट २०२२ पासुन ते आतापर्यंत फियादी यांचे भाजीपाल्याच्या दुकानावर लक्ष्मी स्टोअर्स समोर दापोडी |
| गुन्हा दाखल | :- | ०३/०२/२०२३ रोजी ०१.२७ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १) राजु काची २) किरण काची, ३) महिला आरोपी **अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद केले ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या दुकानावर असताना तसेच दुकानावर जाताना येताना आरोपी क्र १ व २ हे जोरजोरात कवळी काकडी घे, लाललाल टॉमेटो घे, तेल लावलेला माल आहे ईकडे, हलवायचे गाजर घे, तुला मुळा देवु का असे फिर्यादीकडे बघुन फिर्यादीचे मनास लज्जा येईल असे हातवारे इशारे करून बोलत असे. तसेच "तुझे बहीणीला खुप मस्ती आली आहे, तुझ्या बहीणीला काचीचा हिसका दाखवतो, तिला समजावुन सांग नाहीतर तुझ्या दाजीला हाणुन काढील" अशी धमकी दिली त्याबाबत त्यांना विचारले असता आरोपी क्र ३ हिने फिर्यादीस शिवीगाळ केली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि जोनापल्ले ७५८८९१०२५७ |

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | सांगवी ५५/२०२३ भा.दं.वि.क्र. ३५४(ड), ५०६,५०४,४२७,५०७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०१/०२/२०२३ रोजी ०७/३० वा. चे सुमारास भालेकरनगर गल्लीमध्ये पिंपळे गुरव |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०२/२०२३ रोजी २०/४२ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी, वय ४० वर्षे |
| आरोपी | :- | सागर विश्वास माने वय. ३२ वर्षे रा काळेवाडी पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी या घरकामाकरीता भालेकरनगर गल्ली मधून जात असताना यातील आरोपीने त्यांचा मोटार सायकल वरुन पाठलाग करुन थांब तु माझ्या सोबत चल तसेच तुला दाखवतो अशी धमकी दिली फिर्यादी यांना शुक शुक असा आवाज देवुन त्यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करुन त्यांचा विनयभंग केला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोलीस हवालदार १११० सुपे ९६५७०४०४४२ |

६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चाकण १९१/२०२३ भादवि कलम ३२६, प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०२/०२/२०२३ रोजी ४.३० वा चे सुमारास शांताराम भोसले यांचे शेतात संतोष नगर भाम तालुका खेड जिल्हा पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०२/२०२३ रोजी ०१.०५ वा |
| फिर्यादी | :- | अनिल महादेव सोनवणे वय ४५ वर्ष धंदा व्यवसाय राहणार संतोष नगर भाम तालुका खेड जिल्हा पुणे |
| आरोपी | :- | अनिल विठ्ठल कुंभार वय २६ वर्ष राहणार संतोष नगर भाम तालुका खेड जिल्हा पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी याचा चुलत भाऊ बाळासाहेब मधुकर सोनवणे हा शेतात काम करीत असताना शेतात झोपला म्हणुन आरोपी याने त्यास तु काम का करीत नाही , झोपतो का असे म्हणून चिडून शेतात पडलेला दगड हातात उचलून बाळासाहेब यांच्या डोकीस डाव्या बाजूस कानावर मारून त्यास गंभीर जखमी करुन त्यास बेशुद्ध केले आहे म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा/ रेंगडे ९९२२६६८८४७ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ९८/२०२३ भा.द.वि. कलम-३८०,४५४, प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०२/०२/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वा १८.०० वा. सुमारास साईनगर,कॉलनी नंबर-४, कासारसाई ता.मुळशी जि.पुणे मुरकुटे विलास, शिंदेवस्ती, मारुंजी रोड, हिंजवडी ता.मुळशी जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०२/२०२३ रोजी. १३.१७ वा |
| फिर्यादी | :- | राजीव गंगाधर नामपेल्लेलु वय-४७ वर्षे धंदा-वॉचमन रा.साईनगर, कॉलनी नंबर-४, कासारसाई ता.मुळशी |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे राहते घर लॉक लावुन बंद असताना कोणीतरी अज्ञात इसमाने घराचे कडी कोयंडा कशाचेतरी साहयाने तोडुन घरात प्रवेश करुन घरातील कपाटामधील ४ तोळे ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम, व चांदीचे दागिने असा एकुण ९६,५००/- रु किं चा ऐवज घरफोडी करुन स्वताचे फायदयाकरीता चोरुन नेले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | छाया बोरकर म.पोलीस उप-निरीक्षक ९५५२११३१०० |

८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी ११५/२०२३, भा.दं.वि. कलम ३७९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२९/०१/२०२३ रोजी १२/०० चे वा ते दिनांक २९/०१/२०२३ रोजी २२/०० वा.चे. दरम्यान भोसरी सहल केंद्रसमोर भोसरी, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ०३/०२/२०२३ रोजी १३/४९ वा |
| फिर्यादी | :- | शादाब निजाम पठाण वय २६ वर्षं,धंदा -लेबरकॉन्ट्रक्टर, रा.निर्मलादामु डोळस यांच्या घरी भाडयाचे रुममध्ये,सम्राटअशोक नगर,डोळसवाडा,भोसरी,पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची ९०,०००/- रू किंमतीची रॉयल इनफिल्ड क्लासीक ३५० मॉडेल कंपनीची मोटार सायकल खाकी रंगाची तिचा आरटीओ नंबर एम.एच १४/जे.जे.०८३९ ही भोसरी सहल केंद्रसमोर भोसरी,पुणे येथे पार्क केल्या ठिकाणाहुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणुन. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा बोयणे |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी ११०/२०२३ भादवि कलम ४०६, ४२० प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. १२/०४/२०१८ रोजी पासून ते आज पावेतो सर्वे क्रमांक १९६, आदर्श कॉलनी, अक्षय नगर, चक्रपाणी वसाहत, भोसरी पुणे फिर्यादी यांचे राहतेघरी |
| गुन्हा दाखल | :- | ०३/०२/२०२३ रोजी ०२.१४ वा |
| फिर्यादी | :- | शशिकांत राजाराम देसाई वय ५० वर्ष, धंदा-व्यवसाय, रा.ठि-सर्वे क्रमांक १९६, आदर्श कॉलनी, अक्षय नगर, चक्रपाणी वसाहत, भोसरी |
| आरोपी | :- | महिला आरोपी, च-होली रोड, शाळा क्र ४ समोर, आळंदी, ता. खेड, |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी ओथ्री/ऑस्सम प्रा.लि.या कंपनीमध्ये गुंतवणूक केल्यास प्रतिदिवस १ टक्का जास्तीचा नफा मिळवून देण्याची फसवी स्किम सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन केला व त्यांना एकुण ४,००,०००/- रु रक्कम गुंतवणूक करण्यास भाग पाडले व आज रोजीपर्यंत फक्त १०,२००/- मूळ मूद्दल रक्कम परत करुन इतर कोणताही जास्तीचा परतावा/नफा/फायदा/लाभांश फिर्यादीस न देता गुंतवणूक केलेली उर्वरीत रु ३,८९,८००/- मूळ मूद्दल रक्कमेची फसवणूक केली म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि पवार ९५५२५८०५२६ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ८५/२०२३ भा.दं.वि.कलम ४२०, ३४, ५०६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. १९/०३/२०२१ रोजी १०.४९ वा. ते दि.२५/०३/२०२२ चे १५.३२ वा. सुमारास हिमगिरी हायर पर्चेस लिमिटेड ची निगडी शाखा- शॉप नं. १२९, काहिनुर आरकेड, निगडी, पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०२/२०२३ चे १९/५२ वा. |
| फिर्यादी | :- | श्री. दिनेश राजमल जैन वय ५२ वर्षे, व्यवसाय- नोकरी (मॅनेजिंग डायरेक्टर), हिमगिरी हायर पर्चेस लिमिटेड, पुणे मो.क्र. ७२७६५९९७८० |

आरोपी :- १) संतोष भागवत बागल वय ४० वर्षे, रा. भारतरत्न हौसिंग सोसासटी, दत्त मंदीरासमोर, विकासनगर, किवळे, पुणे २)राहुल भीमाप्पा बालीगर वय ४० वर्षे रा. त्रिमुर्ती चौक, दत्तनगर, देहुरोड, पुणे
३)सुनिल काशिनाथ वाघमारे वय ४७ वर्षे रा. भारतरत्न हौसिंग सोसासटी, दत्त मंदीरासमोर,विकासनगर, किवळे, पुणे **आरोपी क्रं १ व ३ अटक आहे**

तपशिल :- वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपीत यांनी वेळोवेळी हिमगिरी हायर पर्चेस लिमिटेड ची निगडी शाखा- शॉप नं. १२९, कोहिनुर आरकेड, निगडी, पुणे येथे येऊन बनावट सोने खरेदीच्या पावत्या दाखवुन सोने बनावट असल्याचे माहित असुन सुध्दा एकुण ८१३.७ ग्रॅम वजनाचे सोने तारण ठेऊन एकुण २७,८०,१००/- (सत्तावीस लाख ऐंशी हजार शंभर रूपये फक्त) सोनेतारण कर्ज घेऊन सदरची रक्कम परत न करता नमुद संस्थेची आर्थिक फसवणुक केली आहे. तसेच त्यांना सोनेतारण कर्जाची रक्कम परत मागितली असता आरोपी क्रं १ याने फोनद्वारे जीवे मारण्याची धमकी दिली. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- परि.पोउपनि केकाण ९४२१०४९६२३

११.

पोस्टे व गु.रजि.नं. :- चिखली ७२/२०२३ भादवि कलम ३६३ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०२.०३.२०२३ रोजी १९.०० वाचे सुमारास. ताम्हाणे वस्ती,चिखली पुणे

गुन्हा दाखल :- दि ०३/०२/२०२३ रोजी १४/५२ वाजता.

फिर्यादी :- वय-३८ व्यवसाय-व्यापार, रा. ताम्हाणेवस्ती,चिखली

आरोपी :- अज्ञात इसम

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचा मुलगा ,वय १६ वर्षे हा अल्पवयीन असल्याचे माहीत असताना कोणीतरी अज्ञात आरोपी याने कोणत्यातरी अज्ञात कारणाकरीता फिर्यादी यांचे कायदेशीर रखवालीमधुन पळवुन नेले म्हणुन.

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि सय्यद ९८२३०४१८५१

१२.

पोस्टे व गु.रजि.नं. :- निगडी ८४/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. ०२/०२/२०२३ रोजी १६/१५ वा. नागरीक सुविधा केंद्र, निगडी प्राधिकरण, पुणे

गुन्हा दाखल :- दि.०३/०२/२०२३ रोजी ०३/१२ वा

फिर्यादी :- कुमारी. सदिच्छा दिपचंद पटेकर, वय - २५ वर्षे, काम - शिक्षण, रा - काशीनाथ पटेकर स्मशान भूमी जवळ, च-होली (बु), ता - हवेली, जि - पुणे

आरोपी :- श्री. शैलेश एकांबरी बासुतकर, वय - ४१ वर्षे, व्यवसाय - नोकरी (डाटा एंन्ट्री ऑपरेटर, नागरीक सुविधा केंद्र, निगडी, पुणे), रा - फ्लॅट नं - १, प्रेमराज पार्क, आनंद नगर, सांगवी, पुणे- ४११०२७
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे दोन लहान बहिणींचे जात प्रमाणपत्रासाठी केलेल्या अर्जावर कार्यवाही करून दोन्ही जात प्रमाणपत्रे मिळवुन देण्यासाठी आरोपी यांनी नागरी सुविधा केंद्र, निगडी याठिकाणी फिर्यादी यांचेकडे ४०००/- रुपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- श्री संदिप व-हाडे,पोलीस निरीक्षक,लाप्रवि, पुणे
मो - ८९९९८२५२८०

१३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | हिंजवडी ९५/२०२३ भा.हत्यार.का. कलम ३(२५) महा.पो.अॅ. कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०२/०२/२०२३ रोजी १८/१० वा. च्या सुमारास शिवज्ञा रेस्टॉरंट हॉटेल जवळ म्हाळुंगे नांदे रोड, म्हाळुंगे ता मुळशी जि,पुणे. येथे |
| गुन्हा दाखल | :- | ०३/०२/२०२३ रोजी ०१.१४ वा |
| फिर्यादी | :- | रवि प्रकाश पवार पोशि/२६५९ हिंजवडी पो. स्टेशन |
| आरोपी | :- | राज कुमार मानवतकर, वय-१९ वर्षे, रा पाषाण गाव पुणे. **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने मा.पोलीस आयुक्त सो.पिंपरी चिंचवड शहर यांचे प्रतिंबधात्मक आदेशाच्या अन्वये कोणीही इसम विनापरवाना सार्वजनिक ठिकाणी कोणतेही शस्त्र,सोटे भाले,चाकु सुरा कोयता तलवारी,दंड काठया बंदुका व शरीरीक इजा करता येईल अशी कोणीतीही वस्तु जवळ न बाळगणे असे प्रतिबंधक आदेश सदरचा आदेशाचा भंग करुन विनापरवाना स्वतःच्या ताब्यात २४,०००/- रु किं चे देशी बनावटीचा पिस्टल, व मॅक्झीन मध्ये एक जिवंत राउंड जवळ बाळगुन असताना मिळुन आला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि खटाळ ९८५०२३१९६० |

१४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | हिंजवडी ९६/२०२३ भा.हत्यारका. कलम ३(२५) महा.पो.अॅ. कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०२/०२/२०२३ रोजी १५/०० वा. च्या सुमारास माणकडुन पौंड कडे जाणा-या रस्त्यावर बापुजी बुवा मंदिरा जवळ रस्त्याचे कडेला येथे |
| गुन्हा दाखल | :- | ०३/०२/२०२३ रोजी ०१.३५ वा |
| फिर्यादी | :- | गणेश पंढरीनाथ सावंत, पोशि/२६४३, वय-२७ वर्षे, दरोडाविरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरीचिंचवड. |
| आरोपी | :- | १) मंगेश नामदेव पालवे, वय-३२ वर्षे, सद्या रा- बी/४, सुरजनगर, कोथरुड डेपो जवळ, कोथरुड, पुणे, मुळ रा-मु.पो.रिहे, ता-मुळशी, जि-पुणे, २) संकेत भरत शिंदे, वय-२३ वषेर्क, रा. मालती अपार्टमेंट शेजारील बिल्डींग, सेल पेट्रोलपंपा जवळ, भुकुम, ता मुळशी, जि पुणे. ३) रुषीकेश दत्तात्रय पारखी, वय-२५ वर्षे, रा मु. गंगापुरवाडी, हिंजवडी फेज-३, पो माण, ता मुळशी, जि-पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने मा.पोलीस आयुक्त साो, पिंपरी चिंचवड यांचे कार्यालय दिनांक २३/०१/२०२३ रोजीचे आदेशान्वये, पिंपरी चिंचवड शहरात पोलीस आयुक्तलय कार्यक्षेत्रात दिनांक २४/०१/२०२३ रोजी ००:०१ वा.पासुन ते दिनांक ०६/०२/२०२३ रोजी २४:०० वा. पर्यंत कोणताही शारीरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु बरोबर नेणे अथवा बाळगणे बाबत मनाई आदेश असताना, सदर आदेशाचा भंग करुन, त्यांचे कब्ज्यात २,१०,०००/- रु किं चे ०६ लोखंडी पिस्टल , ४०००/- रु किं चे ०८ जिवंत काडतुसे (राऊंड),व ३५,०००/- रु किं ची हिरो कंपनीची मोपेड मो सा.नं एम.एच१४/डी.झेड.५०७५ चा मुददेमाल जवळ बाळगण्याचा कोणताही कायदेशीर परवाना नसताना अवैधरित्या बाळगले असताना मिळुन आले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि गोमारे९९२२७५६८२८ |

१५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी ११८/२०२३, भारतीय हत्यार कायदाकलम ३(२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक०३/०२/२०२३ रोजी१३/३५ वा. चे सुमारास स्मशानभुमीजवळ गुळवे वस्तीकडे जाणा-या रोडच्याकडेला, भोसरी, पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०२/२०२३ रोजी १६/४३ वा. |
| फिर्यादी | :- | तुषार राजेंद्र वराडे, वय ३२ वर्षे, पोशि २६५१ नेमणुक भोसरी पोलीस ठाणे, |
| आरोपी | :- | **विधीसंघर्षित बालक** –वय १७ वर्षे, ४ महिने |
| तपशिल | :- | वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील विधीसंघर्षग्रस्त बालक मजकुर याने त्याचे ताब्यात अवैधरित्याविना परवाना एकपिस्टल मॅक्झीनसह, दोन जिवंत काडतुसची किंमत ५२,०००/- रुपये असे हत्यार जवळ बाळगले असताना मिळुन आला. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | एचएस खरात पो हवा ८३१ /९५५२५२२३०१ |

१६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | रावेत ८५/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) महा पो का. क. ३७(१) (३) सह १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०३/०२/२०२३ रोजी १६.१५ वाजता चे सुमारास रमाबाई नगर जवळ असलेल्या पाण्याच्या टाकी जवळील मोकळ्या जागेत |
| गुन्हा दाखल | :- | ता.०३/०२/२०२३ रोजी २२:५२ वाजता |
| फिर्यादी | :- | संदिप रामचंद्र ठाकरे पोहवा १००९ नेमणूक गुन्हे शाखा युनिट ५ पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय |
| आरोपी | :- | अनुज अशोक भोईटे वय. १९ वर्षे रा. गुरुव्दार चौक, श्री साई हौ.सो. वाल्हेकरवाडी पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने आपले कब्जात २५,०००/- रु किं चे एक देशी बनावटीचे पिस्टल व १०००/- रु किं चे दोन जिवंत पितळी रंगाचे काडतुस असा वरील मुददेमाल अनाधिकाराने, विनापरवाना, बेकायदेशीर जवळ बाळगला असताना मिळुन आला असुन त्याने मा. पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयीन पोलीस नोटीस दि. २३/०१/२०२३ भाग-१ पान नं. १५० ते १५१ परि - ९५ विशेष शाखा अन्वये प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केले म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पो.हवा.८५८/ एस.टी.राठोड गुन्हे शाखा युनिट ५, ८९७५७६७७३४ |

१७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | निगडी ८७/२०२३ भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३ (२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०३/०२/२०२३ रोजी १८.३५ वा. चे सुमारास संग्रामनगर झोपडपटी समोर, आझादचौक, ओटास्किम |
| गुन्हा दाखल | :- | दि.०३/०२/२०२३ रोजी २३/२७ वा |
| फिर्यादी | :- | नामदेव महादेव कापसे पोना १९२४ सध्या नेमणुक - गुन्हे शाखा, युनिट - २, पिंपरी-चिंचवड |
| आरोपी | :- | दिपक शशिकांत पवार वय २४ वर्षे, धंदा- मजुरी रा. रुम नंबर १२, बिल्डींग नंबर १०, श्रीराम हौसिंग सोसायटी, ओटास्किम निगडी पुणे **आरोपी अटक आहे** |

तपशिल :- वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने  त्याचे कब्जामध्ये ०१ देशी बनावटीचे पिस्टल व ०१ जिवंत काडतुस असे ५०,५००/- रुपये किंमतीचे  अग्नीशस्त्रे व जिवंत काडतुस विनापरवाना,बेकायदेशीररित्या अनाधिकारने जवळ बाळगुन असताना मिळुन आला म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- -सहा .पो नि. कोरडे ८२७५७८६५४३

१८.

पोस्टे व गु.रजि.नं. :- चिखली ७४/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन-१९५१ चे कलम ३७(१),(३) प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०३/०२/२०२३ रोजी २०/१५ वाजता श्रीनिकेतन हौसिंग सोसायटी समोर, अंदाजे ६० फुट अंतरावर, स्पाईन रोड, कृष्णानगर, चिंचवड, पुणे. या ठिकाणी

गुन्हा दाखल :- दि. ०३/०२/२०२३ रोजी २२/२१ वा

फिर्यादी :- अमोल एकनाथ साकोरे, पोलीस हवालदार ब.नं.११३३, नेमणुक-चिखली पोलिस ठाणे, पिंपरी चिंचवड.

आरोपी :- अभिजीत समाधान उमाळे, वय १९ वर्षे, रा. सुमन निवास, जय शिवशंकर हौसिंग सोसायटी, मोरे वस्ती, चिखली, पुणे. **आरोपी अटक आहे**

तपशिल :- वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने कोणाच्या तरी जिवीतास हानी पोहोचवण्याच्या इराद्याने किंवा इतर कोणताही दखलपात्र गुन्हा करण्याच्या इराद्याने त्याच्याकडे कोणताही कायदेशीर परवाना नसताना ३०,०००/- रु किं ची १ गावठी बनावटीचे  पिस्टल, १०,०००/- रु किं चे १ छ-र्याची बंदुक व १००/- रु किं चे १ जिवंत काडतुस व १००/- रु किं ची एक सॅग असा एकुण ४०,२००/- रु किं चा मुददेमाल बेकायदेशीररित्या स्वताःचे जवळ बाळगले असताना मिळून आला आहे तसेच त्याने मा. पोलीस आयुक्त साो, पिंपरी चिंचवड यांचे पोलीस नोटीस भाग-१ पान नं.१५० दिनांक २३/०१/२०२३ रोजी अन्वये शारीरीक इजा होईल अशी कोणतीही वस्तु बरोबर बाळगण्याचा बंदी आदेश असताना सदर आदेशाचा भंग केला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि गुमाने ९९२२३९९७७७